*शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेतीमालाला बोनस देण्याचे धोरण स्वीकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*तेरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -*

*(१) श्री.हेमंत टकले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"चासकमान (ता.खेड, जि.पुणे) धरणासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केलेल्या असणे, धरणग्रस्त शेतकऱ्यांचे अनेक वर्षापासून पुनर्वसन झालेले नसणे, त्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांनी पुनर्वसन करण्याबाबत अनेकवेळा मागणी, मोर्चे व धरणे आंदोलने करून सुध्दा शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(२) श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना कमी व्याज दराने अर्थसहाय्य देवून त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) कार्य करीत असणे, यासाठी सदर विभागाला अतिरिक्त निधीची आवश्यकता असतांना मागील ३ वर्षापासून शासनाकडून अत्यल्प निधी उपलब्ध होत असणे, राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांनी देखील महामंडळाला निधी देण्याचे बंद करणे, यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने*

